

खेड आगाराच्या मनमानी कारभाराविरोधात भाजपचे धडक आंदोलन

पान ३

शब्दांना सत्याची धार

# प्रहार

हिमालयाच्या कुशीत दुमदुमला कोकण 'कोस्टल हाफ मॅरेथॉन'चा आवाज

पान ८



रत्नागिरी ● बुधवार ९ सप्टेंबर, २०२६ RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० ● वर्ष २२ ● अंक ३०१ ● पाने ८ ● ₹ ५.०० www.prahaar.in epaper.prahaar.in

# 'यूपीआय'शिवाय भारताची फिनटेक कहाणी अपूर्ण

## भारताशी व्यापार करणाऱ्या देशांमध्ये 'यूपीआय'चा विस्तार करणार - पंतप्रधान नरेंद्र मोदी

मुंबई (प्रतिनिधी)

भारतातील डिजिटल व्यवहारांच्या पलीकडे जाऊन आता 'यूपीआय'चा विस्तार हा भारताशी व्यापार करणाऱ्या देशांमध्ये करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न राहणार आहे. भारत-सिंगापूरदरम्यान यूपीआयच्या माध्यमातून व्यवहार करणे दोन भारतीय शहरांमधील व्यवहाराइतकेच सुलभ झाले असून, याच धर्तीवर भारताशी व्यावसायिक संबंध असलेल्या अन्य देशांमध्येही यूपीआयचे जाळे विस्तारण्याची भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी मुंबईत मांडली. 'यूपीआय' हा भारताच्या फिनटेक क्षेत्रातील परिवर्तनाचा प्रमुख आधार असून, त्याचा उल्लेख केल्याशिवाय भारताची फिनटेक कहाणीच अपूर्ण राहते, असे मोदी यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मंगळवारी (दि. ८) बीकेसी येथील 'जिओ वर्ल्ड' सेंटरमध्ये 'ग्लोबल फिनटेक फेस्ट' २०२६ चे उद्घाटन झाले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना ते बोलत होते. या जागतिक फिनटेक महोत्सवाची सातवी आवृत्ती ८ ते ११ सप्टेंबर या कालावधीत मुंबईत आयोजित करण्यात आली आहे. उद्घाटन सोहळ्याला जगभरातील तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोदी यांनी भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेतील यूपीआयच्या भूमिकेचा विशेष उल्लेख केला. २५ ऑगस्ट रोजी यूपीआयने दहा वर्षे पूर्ण केली. दहा वर्षांपूर्वी 'तुमची बँक तुमच्या हातात असेल' असे सांगितले असता अनेकांना ते अशक्य वाटत होते, अशी आठवण मोदी यांनी करून दिली. यूपीआयमुळे आर्थिक सेवा अधिक सुलभ आणि सर्वसामान्यांच्या आवाक्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

यूपीआयचा विस्तार आता देशांतर्गत व्यवहारांपुरता मर्यादित न ठेवता भारताशी व्यापार करणाऱ्या देशांपर्यंत करण्याची गरज मोदी यांनी अधोरेखित केली. भारत आणि सिंगापूरमधील यूपीआय जोडणीचे उदाहरण देताना दोन्ही देशांतील व्यवहार दोन भारतीय शहरांमधील

(पान २ वर)




### मोदींनी केले गणरायाला वंदन

'ग्लोबल फिनटेक फेस्ट'ला प्रत्येकवेळी येताना अधिक ऊर्जा मिळते, तरुणांचा वाढता सहभाग आणि नव्या संधींचा विस्तार जाणवतो, असेही मोदी म्हणाले. भारताची जोखीम घेण्याची क्षमता वाढत असून अनेकांची स्वप्ने प्रत्यक्षात येण्याच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. यंदाच्या फिनटेक फेस्टची संकल्पना 'पोटेन्शियल टू इम्पॅक्ट : एजंटिक एआय, टोकनायझेशन, क्वांटम-ट्रस्टेड, कनेक्टेड, ग्लोबल सिस्टिम्स फॉर इन्क्लुझिव्ह फायनान्स' अशी आहे. महाराष्ट्रासह देशभरात काही दिवसांत गणेशोत्सव सुरू होणार असल्याचा उल्लेख करून मोदी यांनी गणरायाला वंदन करत 'फिनटेक फेस्ट'साठी शुभेच्छाही दिल्या.

# दिशा सालियन प्रकरणाशी संबंध नसेल तर आदित्य ठाकरेंनी हस्तक्षेप याचिका का दाखल केली?

### मंत्री नितेश राणे यांचा सवाल

### तत्कालीन महापौरांनी दिशाच्या आईवडिलांना धमक्या दिल्या





मुंबई (प्रतिनिधी)

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाशी जर आदित्य ठाकरे यांचा कोणताही संबंध नसेल, तर ते वकिलांमार्फत हस्तक्षेप याचिका का दाखल करतात? सुनावणीवेळी त्यांचे वकील न्यायालयात का उपस्थित राहतात?, असा सवाल राज्याचे मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी मंगळवारी उपस्थित केला. तसेच तत्कालीन महापौर किशोरी पेडणेकर यांनी दिशा सालियन यांच्या आई-वडिलांना कथित धमक्या का दिल्या, असा मुद्दाही मंत्री राणे यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित केला.

दिशा सालियन प्रकरणात आपल्याला जाणीवपूर्वक गोवण्याचा प्रयत्न होत असून या प्रकरणात आपली कोणतीही भूमिका नसल्याचे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. या भूमिकेवर प्रतिक्रिया देताना मंत्री राणे यांनी, 'संबंधच नसेल तर त्यांच्या वकिलांनी या प्रकरणात हस्तक्षेपासाठी प्रतिज्ञापत्र का दाखल केले?' असा सवाल उपस्थित केला. प्रत्येक सुनावणीच्या वेळी आदित्य ठाकरे यांचे वकील न्यायालयात का उपस्थित राहतात? महाविकास आघाडी सरकारच्या काळात या प्रकरणात 'लपवाछपवी' का करण्यात आली? दिशा सालियन यांच्या आई-वडिलांना शवविच्छेदनाचा अहवाल तत्काळ का मिळाला नाही? तसेच तत्कालीन महापौर किशोरी पेडणेकर यांनी दिशा सालियनच्या आई-वडिलांना धमक्या का दिल्या? या सर्व बाबींचे उत्तर द्यावे लागेल, असेही ते म्हणाले.

या प्रकरणात आता 'पळवाटा संपल्या असून सर्व दरवाजे बंद झाले आहेत', असे सांगत मंत्री राणे यांनी सीबीआयच्या पुढील तपासात सर्व बाबी स्पष्ट होतील, असा दावा केला. 'आता एफआयआर दाखल होईल, चौकशी होईल आणि दूध का दूध, पानी का पानी होईल,'

(पान २ वर)

## वेचक

### गणेशभक्तांच्या कोकण प्रवासाला टोलमाफी; स्वतंत्र पासचीही व्यवस्था



मुंबई (प्रतिनिधी) : गणेशोत्सवानिमित्त कोकणात आपल्या गावी जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. गणेशोत्सवाच्या कालावधीत कोकणकडे जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांना पथकरातून (टोल) सवलत देण्याची घोषणा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केली आहे. या निर्णयामुळे मुंबई, ठाणे, पुणे आणि राज्यातील इतर भागांतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार असून, त्यांचा प्रवास अधिक सुलभ आणि आनंददायी होणार आहे. शासनाच्या परिपत्रकानुसार, ११ ते २७ सप्टेंबर या कालावधीत ही टोलमाफी लागू राहणार आहे. यामध्ये मुंबई-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ तसेच

(पान २ वर)

# एकाच्या ताटातले काढून दुसऱ्याला देणार नाही!

### मराठा आरक्षणप्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका; चर्चेसाठी सरकारची दारे कायम खुली

मुंबई (प्रतिनिधी)



मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर तोडगा काढताना अन्य कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, अशी भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मांडली. "एकाच्या ताटातले काढून दुसऱ्याला देणार नाही. संविधानाच्या चौकटीत आणि न्यायालयाच्या अधीन राहून मराठा समाजाला जे काही देणे शक्य आहे, ते दिले जाईल," असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर सरकार चर्चेसाठी तयार असून चर्चेची दारे कायम खुली असल्याचेही त्यांनी सांगितले.

(पान २ वर)

### सरकारचे शिष्टमंडळ जरांगेंना भेटणार नाही - विखे पाटील

दरम्यान, मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनीही सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीसाठी आता सरकारचे शिष्टमंडळ जाणार नसल्याचे त्यांनी सांगितले. सोमवारी

(पान २ वर)

# आंबा घाटात पुन्हा रस्ता खचला; विसावा पॉईंटजवळ एकेरी वाहतूक सुरू

देवरूख (प्रतिनिधी)



रत्नागिरी-नागपूर महामार्गावरील आंबा घाटात ओझरेखिंड आणि विसावा पॉईंटदरम्यान रस्त्याच्या दुरवस्थेने पुन्हा गंभीर स्वरूप धारण केले आहे. विसावा पॉईंटजवळ आणखी एका ठिकाणी रस्ता खचला असून सुमारे ५० फूट लांबीचा संरक्षक कठडा खोल दरीत कोसळला आहे. त्यामुळे रस्त्याची बाजूची पट्टीही दरीत खचल्याने वाहनचालकांसमोर अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून संबंधित ठिकाणी बॅरिकेड्स लावून एकेरी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. मात्र, केवळ बॅरिकेड्स लावून वाहतूक सुरू ठेवणे धोकादायक ठरत असल्याची नाराजी वाहनधारकांकडून व्यक्त होत आहे.

काही दिवसांपूर्वी ओझरेखिंड परिसरात संरक्षक भिंत कोसळून रस्त्याला मोठा तडा गेला होता. त्यानंतर आता विसावा पॉईंटजवळ रस्ता खचल्याने आंबा घाटातील वाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नव्याने खचलेल्या वळणावर स्वतंत्र पथक नियुक्त करण्याची मागणीही वाहनधारकांकडून होत आहे. ओझरेखिंड येथे एस.टी. महामंडळ आणि वाहतूक पोलिसांचे पथक गेल्या काही दिवसांपासून वाहतुकीवर नियंत्रण ठेवत आहे. मात्र, धोकादायक ठिकाणी कायमस्वरूपी उपाययोजना होणे आवश्यक आहे.

रस्ता खचल्याने काही ठिकाणी उपलब्ध रस्त्याची रुंदी अवघी आठ फूट राहिली असून त्यावरून

(पान २ वर)

# भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आज रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर

चिपळूण (प्रतिनिधी)



भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण बुधवार दि. ९ सप्टेंबर रोजी रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर येत असून ते पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. बुधवारी दुपारी २ वाजता पक्षाची दक्षिण रत्नागिरी जिल्हा कार्यकारिणी बैठक आयोजित करण्यात आली आहे.

स्वयंवर मंगल कार्यालय माळनाका, रत्नागिरी येथे होणाऱ्या या बैठकीत आगामी संघटन कार्य आणि विविध महत्त्वाच्या विषयांवर विचार मंथन होणार आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण पदाधिकारी व कार्यकर्त्यांना संबोधित करणार असून पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव यांनी केले आहे.

प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांच्यासह भाजप आमदार योगेश सागर, जिल्हा प्रभारी तथा आमदार निरंजन डावखरे, विधान परिषद

(पान २ वर)

# साडवली येथे अवैधरित्या गुरांची वाहतूक करणाऱ्या टोळीचा गोरक्षकांनी केला पर्दाफाश

### दोन बैलांसह साडेतीन लाखांचा मुद्देमाल देवरूख पोलिसांकडून जप्त; पाचजणांवर गुन्हा दाखल

देवरूख (प्रतिनिधी)

दोन बैलांची विनापरवाना आणि निर्दयीपणे वाहतूक होत असल्याची माहिती साडवली येथील गोरक्षकांना मिळताच त्यांनी या अवैधरित्या गुरांच्या वाहतुकीचा सोमवारी पहाटे पर्दाफाश केला व देवरूख पोलिसांना यासंदर्भात माहिती दिली. देवरूख पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून दोन बैलांसह बोलेरो पिकअप असा एकूण सुमारे ३ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. तर पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे साडेचारच्या सुमारास साडवलीपार, ता. संगमेश्वर येथे बोलेरो पिकअप क्रमांक एमएच-१०-झेड-८८६७ मधून दोन बैलांची वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. संबंधितांकडे प्राणी वाहतुकीचा आवश्यक परवाना नसल्याचे समोर आले. तसेच बैलांना आखूड दोरीने करकचून बांधून त्यांच्या हालचालींना वाव न देता वाहनाच्या हौद्यात दाटीवाटीने भरल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. कत्तलीच्या उद्देशाने साडवली ते मलकापूर अशी ही वाहतूक केली जात असल्याचा पोलिसांचा आरोप आहे.

या प्रकरणी गोरक्षक श्रीधन तानाजी बाळकुंद्री (वय ३०, रा. साडवली साईनगर, ता. संगमेश्वर) यांच्या फिर्यादीवरून देवरूख

(पान २ वर)

# गरब्यात मुस्लिमांना 'नो-एन्ट्री'

### मंत्री नितेश राणे यांची भूमिका

### 'लव्ह जिहाद' रोखण्यासाठी प्रवेशासाठी आधारकार्ड अनिवार्य असावे

मुंबई (प्रतिनिधी)



नवरात्रौत्सवातील गरबा आणि दांडिया कार्यक्रमांमध्ये प्रवेश देताना आधारकार्ड अथवा ओळखपत्राची सक्ती करण्याच्या मागणीला मत्स्य व्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी पाठिंबा दिला आहे. 'लव्ह जिहाद'च्या घटना रोखण्यासाठी गरबा आयोजकांनी प्रवेशापूर्वी ओळख तपासावी, अशी भूमिका मंत्री राणे यांनी मंगळवारी मांडली. मुस्लिम तरुणांना गरब्यात सहभागी व्हायचे असल्यास त्यांनी हिंदू धर्म स्वीकारावा, त्यानंतरच हिंदू पद्धतीने उत्सवात सहभागी व्हावे, असेही ते म्हणाले.

विश्व हिंदू परिषदेने गरब्यात सहभागी होणाऱ्यांकडे आधारकार्ड किंवा ओळखपत्र असावे, अशी भूमिका घेतली असून त्यावर आदित्य ठाकरे यांनी टीका केल्याबाबत मंत्री राणे यांना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर हा राजकीय नव्हे तर धार्मिक विषय असल्याचे सांगत त्यांनी या मागणीचे समर्थन केले. हिंदू सणांमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींची ओळख स्पष्ट असणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. गरबा आणि नवरात्रौत्सवाच्या ठिकाणी काही तरुण हिंदू नाव सांगून,

(पान २ वर)

# गवारेड्याच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या साडवली सह्याद्रीनगरमधील तरूणाचा मृत्यू

देवरूख (प्रतिनिधी)

देवरूख-रत्नागिरी मार्गावरील आंबव येथे शुक्रवारी सकाळी गवारेड्याच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या साडवली सह्याद्रीनगर येथील स्वप्नील पेडामकर (वय-३७) याची मृत्यूशी सुरू असलेली झुंज अपयशी ठरली आहे. तीन दिवसांनी अखेर उपचारादरम्यान त्याचा सोमवारी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे सह्याद्रीनगर मित्रमंडळातर्फे यंदाचा दहीहंडी उत्सव रद्द करून त्यातून जमा झालेला निधी स्वप्नीलच्या उपचारासाठी देण्यात आला होता.



स्वप्नील पेडामकर

स्वप्नील पेडामकर हा शुक्रवारी सकाळी कामानिमित्त आपल्या ताब्यातील मोटारसायकलवरून देवरूखहून रत्नागिरीकडे जात होता. याचवेळी आंबव येथे सकाळी ८.३० वा.च्या सुमारास रस्त्याच्या कडेला असलेल्या जंगलातून गवारेडा धावत रस्त्यावर आला व या गव्याची मोटारसायकलला धडक बसली. गव्याच्या जोरदार धडकेत रस्त्यावर फेकला गेल्याने स्वप्नीलच्या डोक्याला आणि हाता-पायाला

(पान २ वर)

# शिमगोत्सवातील मानपान रुढीपरंपरा योग्यच; नांदिवसे प्रकरणात चिपळूण न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

चिपळूण (प्रतिनिधी)

शिमगोत्सवात पिढ्यानपिढ्या चालत आलेले मानपान, रूढी-परंपरा, पूजाअर्चा हे घटनाबाह्य नसून ते योग्यच आहेत. मानकरी हे मंदिर देवस्थानचे मालक नसले तरी त्यांच्या श्रद्धेला व मानपानाच्या हक्काला ठेच पोहचवता येणार नाही, असा अत्यंत ऐतिहासिक निकाल चिपळूण तालुक्यातील नांदिवसे शिमगोत्सव प्रकरणात चिपळूण येथील जिल्हा न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे गेले ३० ते ३५ वर्षे सुरू असलेला नांदिवसे शिमगोत्सवातील वादावर आता पूर्णपणे पडदा पडला असून पूर्वीप्रमाणे शिमगा साजरा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या प्रकरणात चिपळूणस्थित मुंबई उच्च न्यायालयाचे प्रख्यात वकील ॲड. संदेश भोसले, ॲड. इंद्र भोसले, चिपळूणचे युवा वकील ॲड.अरमान खान व ॲड.अश्विनी बेलोसे यांनी केलेला जोरदार युक्तिवाद आणि दिलेले दाखले ग्राह्य धरत न्यायालयाने हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे.

नांदिवसे ता.चिपळूण येथील मंदिरांचा शिमगोत्सव फाल्गुन महिन्याच्या पाचव्या दिवसापासून सुरू होत असे. या तिन्ही मंदिराचे येथील शिंदे घराणे हे मानकरी होते. त्यांच्या आदेशानुसार व सुचनेनुसार येथील शिमगोत्सव साजरा केला जात होता. परंतु १९८८ साली वैयक्तिक वादाची ठिणगी पडली आणि थेट गावातील शिमगोत्सवापर्यंत हा वाद पोहचला. गावात दोन गट निर्माण झाले. दुसऱ्या गटाने शिंदे घराण्याच्या मानपाला थेट विरोध करत शिमगोत्सव हा सार्वजनिक उत्सव असून गावातील सर्व ग्रामस्थ एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात, त्यामुळे शिंदे घराण्याचा कोणताही हक्क या मंदिरावर पर्यायाने शिमगोत्सवावर नाही, असा आरोप केला. त्यामुळे वादाला फोडणी

(पान २ वर)

# मोदींच्या कार्यक्रमात घुसखोरी; एकाकडे बंदूक आढळल्याने खळबळ

मुंबई (प्रतिनिधी)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुंबई दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर बीकेसीतील नीता मुकेश अंबानी कल्चरल सेंटरमध्ये (एनएमएसीसी) आयोजित कार्यक्रमाच्या ठिकाणी बनावट ओळखपत्राच्या आधारे प्रवेश करण्याचा प्रयत्न झाल्याने सुरक्षा यंत्रणांमध्ये खळबळ उडाली. स्वतःला पंतप्रधान कार्यालयातील अधिकारी असल्याचे भासवणाऱ्या २४ वर्षीय रोहन पारेख याच्यासह एकाला मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले. पारेख याच्याकडे बनावट

(पान २ वर)

# महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेच्या 'जिल्हा सनियंत्रण समिती'चा दणका

### १४ रुग्णालयांनी रुग्णांकडून घेतलेले पैसे केले परत

रत्नागिरी (वार्ताहर)

शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना' व 'आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजने'चा लाभ प्रत्येक गरजू रुग्णापर्यंत विनाअडथळा पोहोचावा, यासाठी प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आली आहे. रुग्णांची अडवणूक, उपचारांत दिरंगाई किंवा अतिरिक्त पैशांची मागणी करणाऱ्या अंगीकृत रुग्णालयांना चाप लावण्यासाठी जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या 'जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समिती'ने सर्व खासगी व शासकीय रुग्णालयांवर आपली करडी नजर ठेवली आहे. १४ रुग्णालयांनी रुग्णांकडून उपचारासाठी पैसे घेतले होते. मात्र समितीकडे या प्रकाराची तक्रार होताच समितीने घेतलेल्या कडक भूमिकेनंतर हे पैसे रुग्णांना परत करण्यात आले.




जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली उच्चस्तरीय दक्षता यंत्रणा योजनेच्या अंमलबजावणीत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून या समितीची धुरा थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आली असून, जिल्हा शल्य चिकित्सक हे समितीचे सदस्य सचिव म्हणून काम पाहत आहेत. या समितीत प्रशासकीय, वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रातील महत्त्वाच्या घटकांचा समावेश आहे. यामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी, अंमलबजावणी सहाय्य संस्थेचे जिल्हा प्रमुख, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे जिल्हा समन्वयक, भारतीय वैद्यकीय परिषदेचे (IMA) प्रतिनिधी, (जिल्हाधिकाऱ्यांद्वारे नियुक्त) सहाय्यक संचालक (वैद्यकीय) व उपसंचालक, आरोग्य सेवा,

(पान २ वर)

# रत्नागिरी-वलसाड एक्स्प्रेसची खेड रेल्वे स्थानकावर प्रवाशाला धडक

### प्रवासी गंभीर जखमी

खेड (प्रतिनिधी)

खेड रेल्वे स्थानकावर मंगळवारी सकाळी रत्नागिरी-वलसाड एक्स्प्रेसची धडक बसल्याने एक प्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. सकाळी सुमारे ७.५० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेमुळे रेल्वे स्थानक परिसरात काही काळ खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, खेड रेल्वे स्थानकावर रत्नागिरी-वलसाड एक्स्प्रेस जात असताना एका प्रवाशाला धडक बसली. या अपघातात खोपी येथील सखाराम लाड (वय ६५) हे गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी तत्काळ मदतकार्य सुरू करण्यात आले. भरणे नाका पुलाखाली २४ तास अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सज्ज असलेली जगद्गुरु रामनंदाचार्य श्री नरेंद्राचार्यजी महाराज संस्थान, नाणीजधाम यांची विनामूल्य रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाली. रुग्णवाहिका चालक सुरज हंबीर यांनी जखमी सखाराम लाड यांना तातडीने उपचारासाठी

(पान २ वर)

